CCPS CENTER FOR CHEMICAL PROCESS SAFETY An AIChE Industry Technology Alliance

Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx


उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश


CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित

# आपण “दीपस्तंभाचा” कसा उपयोग करू शकता?

फेब्रूवारी २००८







संवेदनशीलतेची जाणीव निर्माण करणे हे चांगली प्रक्रीया सुरक्षा संस्कृती निर्माण करण्यातील एक महत्वपूर्ण अंग आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर आपण आपली प्रक्रीया व सामग्री यांच्याशी संबंधीत धोके यांचे जाणीवपूर्वक भान ठेवायला हवे. जर आपल्याकडे उचित आणि प्रभावी प्रक्रीया सुरक्षा व्यवस्थापन पध्दती असेल तर त्याची निष्पत्ती आपल्याकडील दुर्घटना कमी होण्यात होते. आपण प्रक्रीया सुरक्षा व्यवस्थापन पध्दतीअंतर्गत जे कार्य करतो त्याची परीणती, चांगली कामगिरी आणि कमी अथवा शून्य अपघातामध्ये होते हे आपण विसरतो. म्हणून धोके ओळखणे आणि जोखीम पडताळणी (यामध्ये संबंधित प्रक्रीयेतील विशेष जाणकार व्यक्तिंचा सहभाग असावा), सुरक्षित कार्यपध्दती, मालमत्तेची अखंडता आणि विश्वासार्हता, बदल व्यवस्थापन, आणीबाणी व्यवस्थापन, दुर्घटनांचे अन्वेषण, परीक्षण असे अनेक उपक्रम जर आपण राबवले नाहीत तर काय परीणाम होऊ शकतात याची आपणास आठवण करून देण्यास ‘दीपस्तंभ’ सारखी साधने उपयोगात असणे महत्वाचे आहे. दीपस्तंभामध्ये चर्चिल्या गेलेल्या सर्व दुर्घटनांमध्ये अशा एकानेक महत्वपूर्ण प्रक्रीया सुरक्षा व्यवस्थापन पध्दतींमधे अपरिपूर्णता होती.

## आपणास माहीत आहे का?

•जवळपास सर्वच दुर्घटना एकापेक्षा जास्त बिघाडांमुळे होतात. काही बिघाडांमधे थोडक्यात बचाव (Near Miss) होतो म्हणजे प्रत्यक्ष दुर्घटना होत नाही पण होऊ शकली असती.

•दीपस्तंभामध्ये चर्चा झालेल्या दुर्घटनांमधून मिळणारे इतरही संदेश जे दीपस्तंभामध्ये समाविष्ट नसतात, ते निदर्शनास आणून देणारे अनेक इ-मेल जवळपास प्रत्येक महिन्यात मिळत असतात.

•दीपस्तंभातील जागेच्या मर्यादित उपलब्धतेमुळे प्रत्येक दुर्घटनेतील विविध संदेशांतून एखाद दुसरा संदेश निवडावा लागतो व त्यावरच तो दीपस्तंभ केंद्रीत असतो. तथापि त्यात इतरही संदेश असतातच.

•शक्य असेल तेव्हा, चर्चिलेल्या दुर्घटनांचे अहवाल सार्वजनिक वापरास उपलब्ध असल्यास त्याचा संदर्भ आम्ही दीपस्तंभाच्या इ-मेल मुखपत्रात देऊ.

## आपण काय करू शकता?

•कामगार पहातील अशा ठिकाणी हा दीपस्तंभ प्रदर्शित करा उदाहरणार्थ, वार्ताफलक, विश्रांती कक्ष, नियंत्रण कक्ष, गेट वगैरे

•यापेक्षा चांगला प्रकार म्हणजे दीपस्तंभावर आधारित सेफ्टी मीटींग घ्यावी अथवा सुरक्षेवरील अन्य चर्चामध्ये दीपस्तंभाचा समावेश करावा.

•आपल्या कारखान्यात घडलेल्या धोकादायक घटनांचा समावेश असलेल्या प्रक्रीयांविषयी दीपस्तंभामधील विषयाशी संदर्भ असणारी माहिती संकलीत करा आणि त्याची कामगारांसोबत चर्चा करा.

•सर्वोत्तम पर्याय म्हणजे व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांनी कामगारांबरोबर दीपस्तंभावरील चर्चेत पुढाकार घ्यावा आणि त्यांना दीपस्तंभामधे उल्लेखिलेल्या शिकवणूकींव्यतिरिक्त अजून काही शिकण्यासारखे आहे, का ते शोधण्यास सांगावे. प्लांट सेफ्टी कमिटींना दीपस्तंभामधील माहितीचा उपयोग त्यांच्या कार्यस्थळी करण्यास सांगावे.

**दुसऱ्यांच्या अनुभवातून शहाणे व्हा !**

**AIChE** © २००७. सर्वाधिकार सुरक्षित. अव्यावसायिक व शैक्षणिक हेतूसाठी पुनरूपयोगास प्रोत्साहन आहे. तथापि **CCPS** शिवाय अन्य कोणत्याही व्यक्ति अथवा संस्थेने विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क: ccps_beacon@aiche.org किंवा २१२-५९१-७३१९

हा दीपस्तंभ चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, गुजराथी, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इटालियन, जपानी, कोरियन, मलय, पर्शियन, पोर्तुगिज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, थाई आणि मराठी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे. .

**This document is translated by Mr. S.K. Gulawani of Excel Industries Limited, Maharashtra, India**